# भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील हुतात्मे

## १) पालघरचे पाच हुतात्मे

## २) हुतात्मा अण्णाभाऊ पत्रावळे

## ३) हुतात्मा शिरीषकुमार

## ४) हुतात्मा इंदूभुषण

लेखक

चंद्रकांत शहासने

(देशभक्तकोशकार)

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या सौजन्याने

ही पुस्तिका कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या राष्ट्रभक्ती पर्यावरण आणि आरोग्य साक्षरता अभियानअंतर्गत प्रकाशित केली.

पुस्तकाचे नाव : भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील पालघरचे हुतात्मे

लेखक : चंद्रकांत शहासने (देशभक्तकोशकार) पुणे
मो.क्र. – ९८८१३ ७३५८५

प्रकाशक : बहुजन साहित्यधारा, पुणे
११ ए, राहुल कॉम्प्लेक्स,
चौथा मजला, पौड रोड, पुणे.
दुरध्वनी : ९८८१३७३५८५
हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

प्रकाशन दिनांक : २५ डिसेंबर २०२२ पहिली आवृत्ती

मुद्रक : श्री वेंकटेश पब्लिकेशन, पुणे
हिंगणे खुर्द, सिंहगड रोड. मो. क्र. ८२३७८ ९३३४७

पुस्तकाचे हक्क : ॲड. नंदिनी शहासने

ही पुस्तिका कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या राष्ट्रभक्ती पर्यावरण आणि आरोग्य साक्षरता अभियानअंतर्गत प्रकाशित केली.

मूल्य : रूपये ५०/–

संपर्क : श्री. हेमंत प्रभाकर आळवे, ठाणे
मो. : ९३२२२६९७२१
श्री. अशोक जनार्दन फडणीस, मेणोली–वाई
९८५०५ ०९४१६
श्री. भानुदास सोपान पायगुडे, धनकवडी–पुणे
९८५०३५१०३५

Or Pay to VPA

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे या संस्थेस दिलेल्या देणग्या आयकर माफीस प्राप्त आहेत.

No.: THN/C.I.T.II/Tech/80G/104/2010-11/1479 Dt: 21/09/2010

# हुतात्मा काशीनाथ हरी पागधरे, सातपाटी



**समोरून धावत येणाऱ्या या युवकावर नेम धरून मारल्यासारखी एक गोळी सणाणत आली आणि कपाळावर खाली आलेल्या टोपीला भोक पाडून थेट त्याच्या भालप्रदेशात घुसली. तत्क्षणीच सातपाटीचा हा निष्ठावान युवक धरणीवर कोसळला.**

पालघरच्या हुतात्म्यांमध्ये कार्याच्या दृष्टीने ज्येष्ठ आणि बहुधा वयानेही सर्वात मोठा (वय २७) तोच असावा. काशीनाथचे सर्व कुटुंबच स्वातंत्र्य आंदोलनात हिरीरीने सतत सहभागी झालेले. त्याचे वडील हरी नारायण पागधरे हे मच्छिमार समाजातील क्रियाशील कार्यकर्ते. मोठे बंधू रामचंद्र व धाकटे विठोबा हेही स्वातंत्र्यसैनिक. घरचे सर्व वातावरणच १९३० पासून राष्ट्रीय चळवळीचे होते.

काशीनाथचे शिक्षण इ. ५ वी पर्यंत सातपाटीतच झाले. नंतर तो वडिलांना व्यवसायात थोडीबहुत मदत करू लागला. मिठाच्या सत्याग्रहापासून सातपाटी गावाला वेगळे वळण मिळाले. धर्माजी तांडेल, बाबूराव जानू पाटील, पंडित जगन्नाथ मेहेर इ. मंडळींनी विरार-वसई-अर्नाळा येथील शिबीरात भाग घेऊन सत्याग्रहाचे प्रशिक्षण घेतल आणि नंतर गावात खादी प्रसार, अस्पृश्यता निवारण, दारुबंदी इ. कामे जोरात सुरू केली. तेव्हापासून तो सातत्याने सर्व राष्ट्रीय चळवळीत स्वयंस्फूर्तीने भाग घेत राहिला. १९३८ च्या ऑगस्टमध्ये सातपाटीस राम मंदिरात झालेल्या काँग्रेस सेवा दलाच्या प्रदीर्घ शिबीरात त्याला आचार्य भिसे, एस्. एम्. जोशी, नानासाहेब गोरे इ. च्या बौद्धिकांतून वैचारिक शिक्षण मिळाले आणि पद्धतशीर कार्याची चांगली दृष्टी आली. याच शिबीरात तो व त्याचे बंधू यांनी चहा, धूम्रपान, तंबाखू, मद्य यांना स्पर्श न करण्याची शपथ

घेतली.

१९३९ साली मुंबईतील काँग्रेस अधिवेशनात तो स्वयंसेवक म्हणून उपस्थित राहिला. फेब्रुवारी १९४१ मध्ये एडवण येथे त्याने वैयक्तिक सत्याग्रह केल्यामुळे ठाणे तुरुंगात ६।। महिने सश्रम कारावास त्याला भोगावा लागला. याच काळात त्याला विषमज्वर झाला. त्यामुळे सुटकेनंतरही त्याची प्रकृती पूर्णपणे सुधारली नाही.

१९४२ सालीही काशीनाथ मधून मधून थोडा आजारी होता. औषध घेऊनच मुंबईच्या 'छोडो भारत' अधिवेशनास तो हजर राहिला. धर्माजी तांडेलांच्या हालचालींवर सरकारची पाळत होती म्हणून त्यांना 'तुम्ही सातपाटीस येऊ नका, मुंबईसच गुप्तपणे रहा' असे सांगून त्या ज्येष्ठ कार्यकर्त्याच्या शिरावरची जबाबदारी त्याने आपणहून अंगावर घेतली. 'सातपाटीची कामे मी सांभाळतो' असे त्यांनी वचन दिले. बोईसर येथील कार्यकर्त्यांच्या (दि. ११ ऑगस्टच्या) गुप्त बैठकीत मोर्चाचा निर्णय झाला. त्यानंतर मोर्चा यशस्वी करणे हा त्याचा ध्यास झाला. गावात प्रचार सभा, घरोघर हिंडून माणसे जमविणे यात त्याचा प्रमुख भाग होता. आपल्या प्रकृतीची फिकीरच त्याने केली नाही.

**मुंबईत असलेला धाकटा भाऊ विठोबा याला त्याने चिठ्ठी पाठविली. 'गावातली गलबते आता वादळात जाणार आहेत. मी माझंही त्यात सोडतोय'. त्याच्या प्रकृतीची चिंता करणाऱ्या आईला त्याने सांगितले, 'चांगल्या कार्यासाठी जातो आहे. काळजी कशाला करतेस?' नंतर ठक्या बारीक मेहेर याच्याजवळ आईसाठी पुनः निरोप पाठविला 'मी परत आलो नाही तर देशासाठी तुझा मुलगा गेला असे समज. रडायचे नाही. मी पुन्हा तुझ्या पोटी येईन. आपण सर्वांनी देशाची सेवा करायची आहे.'**

दि. १४ ऑगस्ट १९४२, सातपाटी गटाच्या अग्रभागी तो तिरंगा ध्वज हाती घेऊन होता, पालघरमध्ये कचेरी रोडच्या नाक्यापाशी पोलिसांनी रस्ता अडविल्यामुळे गावातून फेरी काढून सभा घेण्याची सूचना त्यानेच केली होती, असे सांगतात, त्या कल्पनेनुसार मोर्चाचा ओघ स्टेशनकडे वळला आणि तेवढ्यात मागे सुरू झालेल्या लाठी हल्ल्यात वडील बंधू रामचंद्र यांना तडाखे

बसले, हे त्याच्या नजरेस पडले. पाठोपाठ गोळीबाराचाही आवाज आला. हा अनपेक्षित प्रकार ध्यानात येताच मोर्च्याची जबाबदारी शिरावर घेतलेला कर्तव्यनिष्ठ काशीनाथ पागधरे दूर पळून जाणे शक्यच नव्हते. हातातील ध्वज सांभाळत तो त्वेषाने मागे फिरला आणि चौकाच्या दिशेने धावला, पण मृत्यूने त्याच्यासाठी जणू जबडा उघडलेलाच होता. स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात या तरुण कार्यकर्त्यांची आहुती पडावयाची हे त्याच्या भाळी लिहिलेलेच होते. माणसांची पांगापांग होऊन रस्ता रिकामा होत होता. अशा वेळी समोरून धावत येणाऱ्या या युवकावर नेम धरून मारल्यासारखी एक गोळी सणाणत आली आणि कपाळावर खाली आलेल्या टोपीला भोक पाडून थेट त्याच्या भालप्रदेशात घुसली. तत्क्षणीच सातपाटीचा हा निष्ठावान युवक धरणीवर कोसळला.

गोळीबार थांबल्यावर स्वयंसेवकांनी प्रथम काशीनाथलाच उचलले. डॉ. जोशींनी तपासले. केवळ थोडी धुगधुगी होती. त्यांचे वडीलभाऊ रामचंद्र मोर्च्यात होते. आपल्या भावाचा जवळपास निष्प्राण झालेला देह त्यांनी पाहिला. त्यांना गदगदून आले पण त्यांनी शोक केला नाही. त्याचे मस्तक मांडीवर घेऊन त्याच्या भाळीच्या रक्ताचा टिळा आपल्या मस्तकी लावला. ज्या सातपाटीच्या भूमीने अशी उत्कट देशभक्ती आपल्या सुपुत्रांना शिकविली ती सातपाटी खरोखर धन्य होय!

काशीनाथला टांग्यातून माहीमला नेले. बहुधा वाटेतच काशीनाथचे प्राण स्वर्गस्थ झाले असावे. नंतर मारुत मेहेरांनी थोडी धिटाई करून माहीम दवाखान्यातून रात्रीपूर्वीच शव हलविले.

दुसऱ्या दिवशी दि. १५ ऑगस्टला काशीनाथची अंत्ययात्रा सर्व गावात गल्लोगल्ली फिरली. अनेकांनी हार अर्पण केले. या युवकाच्या बलिदानाने सारे गाव हळहळले. अण्णा बाळा पाटील यांनी उत्स्फुर्तपणे एक गीत रचून म्हटले. भुवनेश कीर्तने यांचे अतिशय हृदयस्पर्शी भाषण झाले. काशीनाथचा देह अग्निसात होत असताना संतप्त झालेल्या युवकांनी या बलिदानाचा बदला घेण्याची मनोमन प्रतिज्ञा केली.

# पालघर तालुक्यातील पहिला हुतात्मा!
# हुतात्मा वामन देवजी तांडेल

९ ऑगस्टला राष्ट्रीय पुढाऱ्यांना अटक होताच लोकात प्रक्षोभ निर्माण होऊन जनसागरच उसळला! गोवलिया टॅकपासून झेंडावंदनाला सुरुवात झाली व मुंबई शहरातील जवळ जवळ पूर्ण व्यवहार बंद पडला आणि जागोजागी लाठीमार व गोळीबार सुरु झाला.

त्यावेळी लोकांत बातमी पसरली की, संध्याकाळी शिवाजी पार्कच्या मैदानावर कस्तुरबा गांधी भाषण करणार आहेत. अशा या भारावलेल्या वातावरणात संध्याकाळी मुंबई शहरातील हजारो लोक शिवाजी पार्कच्या मैदानावर जमले. चारही बाजूने लोकांचे थवेच्या थवे येत होते. या जमावात पालघर तालुक्यातील माहीमचा तरुण वामन देवजी तांडेल होता. या जमावावर पोलिस अश्रुधूर सोडीत होते. लाठीमार व गोळीबारही करीत होते. परंतु लोक या अश्रुधुराला दादा देत नव्हते. अनुधुराची नळकांडी पडल्याबरोबर लोक पाण्याच्या बादल्या ओतून किंवा झाडांच्या फांद्यांनी ते विझवून टाकण्याचा प्रयत्न करीत असत. लोक पेटलेले होते व त्यांच्यात हिंमत चेपली होती.

या चळवळीत वामनरावांना पायाला गोळी लागली, असा स्थितीत ते बाहेर पडले असताना त्यांच्या डोक्याला गोळी लागून त्यांना हौतात्म्य आले. हे हुतात्मे माहीम येथील (टेंभी) राहणारे होते. ते मच्छिमार समाजातील असून मुंबईस रेल्वेमध्ये सुतार म्हणून कामाला होते. पुढे बढती मिळून फोरमन झाले होते. त्यांचे मुंबईस दादर येथे वास्तव्य होते. ९ ऑगस्ट १९४२ च्या चळवळीच्या वेळी ३५ वर्षे वयाचे असावेत. त्यांचे शिक्षण मराठीत ५ वी ते ६ वी पर्यंत झाले होते. त्यांच्या मागे त्यांची पत्नी विठाबाई ही माहीम टेंभीस येथे येऊन राहिली व पुढे १९८८ साली तिचे निधन झाले.

कै. विठाबाईस सन्मानपत्र मिळाले असून त्यांना सरकारी पेन्शन मिळत होती.

पालघर येथे धारातिर्थी पडलेल्या हुतात्म्याचे आपण स्मरण करतो व श्रद्धांजली अर्पण करतो. या पाच हुतात्म्यांबरोबर मुंबई येथे हौतात्म्य पत्करलेले पालघर तालुक्याच्या सहाव्या हुतात्म्याचे आपण स्मरण करु या. या सहाही हुतात्म्यांचा पालघर तालुक्यातील लोकांना यथोचित अभिमान आहे व त्यांची मान उंचावते!

**त्रैमासिक कर्नाळा मधील प्रकाशित लेख साभार.**

# हुतात्मा रामप्रसाद भीमशंकर तेवारी, पालघर



पालघर येथे अनेक वर्ष राहणाऱ्या उत्तर प्रदेशीय कुटुंबातील हा मुलगा. उत्तर प्रदेशात १९२५ मध्ये जन्मून पुढे पालघरमध्ये याचे बालपण व शिक्षणकार्य झालेले. अभ्यासापेक्षा खेळ व धाडसाची कामे यात अग्रेसर असलेला. १९४० मध्ये आर्यन हायस्कूलमध्ये दाखल होऊन ४-५ महिन्यांनी शाळा सोडून तो घरीच राहिला होता. शरीर प्रकृतीने चांगला धिप्पाड व दणकट होता. १६-१७ वर्षाचा असूनही २०-२१ चा तरुण वाटे. स्वभावाने धीट व साहसी. त्यामुळे समवयस्क मुलांत आवडता होता. त्यांचा म्होरक्या होता डाह्याभाई आलोपी प्रसाद, प्रसन्न नाईक, प्रभाकर कदम इ. अनेक मित्र त्याला होते. या मित्रांबरोबर तो व त्याच्या कुटुंबातली अन्य मुले राष्ट्र सेवादलात जात. पण तिथल्या कार्यक्रमाबद्दल घरी चर्चा करीत नसत, किंबहुना सांगतही नसत. त्यामुळे वडीलधाऱ्या मंडळींना रामप्रसादच्या दिवसभरच्या उद्योगांबद्दल फारशी माहिती नसे.

त्यावेळच्या उत्तर प्रदेशीय समाजातील प्रथेनुसार त्याचा विवाह १५व्या वर्षीच झाला होता. लग्न होवून दोनच महिने उलटले होते. त्याची पत्नी काहीशी अजाण वयाची असून तोपर्यंत मुलखातच राहिलेली होती. त्यामुळे वैवाहिक जीवनाची अजून तोंडओळखही झालेली नव्हती. दिवसभर खेळणे, पोहणे, राष्ट्रसेवादलाच्या कार्यक्रमात सामील होणे यातच त्याचा वेळ जाई.

१९४२ साली भाऊसाहेब रानडे व शिवकरण ठाकूर सेवादलाच्या मुलामुलींना पोहायला शिकवीत. आंदोलन काळात या निमित्ताने एकत्र आलेली

मुले चर्चा करुन काही गुप्त बेत ठरवीत. ९ ऑगस्टला प्रमुख राष्ट्रीय नेत्यांची धरपकड झाल्याची बातमी कळल्यावर राष्ट्रसेवादलाची मुले चिंताक्रांत झाली. सरकारी इमारतींवर, जवळच्या झाडांवर, चढून राष्ट्रध्वज लावणे, तारेच्या खांबावर चढून तारा तोडणे, कचेरीतील कागदपत्रांना आग लावणे इ. सारखे धाडसी बेत आखण्यात रामप्रसाद नेहमी पुढे असे. प्रभात फेऱ्या, गाणी, भाषणे यापेक्षा काही साहसी उपक्रम योजण्यात त्याला धन्यता वाटे.

दि. १४ ऑगस्टला येणाऱ्या मोर्चासाठी पालघरमध्ये सशस्त्र पोलिसांची नेमणूक झाल्याचे आढळल्यावर मुले खूप अस्वस्थ झाली. पोलिसांना तारेने संदेश पाठविणे अशक्य व्हावे या हेतूने महत्त्वाच्या खांबांवरील तारा तोडण्याचा प्रयत्न त्या दिवशी सकाळी रामप्रसादाने केल्याची हकिगत त्याचे मित्र सांगतात. तो प्रयत्न फसल्यावर रामप्रसाद घरी गेला. सर्व मुले जेवायला बसली. त्याचे जेवण अर्धे झाले नाही तोच डाह्याभाई, आलोपी, बाळ जोशी इ. मित्र मोर्चासाठी त्याला बोलवायला गेले. वडील रागावले होते पण चुलत्यांनी परवानगी दिली आणि रामप्रसाद अर्धे जेवण टाकून सेवादल सैनिकांत दाखल झाला. यांच्याबरोबर मोर्च्यात मिसळला.

नंतर थोड्याच अवधीत लाठीहल्ला – गोळीबार सुरू झाला आणि मोठ्या मंडळींनी सेवादलाच्या मुलांना सुरक्षिततेसाठी गल्लीबोळात ढकलले. त्यामुळे मित्रांची फाटाफुट झाली. रामप्रसाद रामाच्या देवळाकडे ढकलला गेला. इतर लोक व मुले तेथे आसरा घेऊन दडून राहिली होती. पण नुसते दडून राहणे रामप्रसादच्या स्वभावात नव्हते. पोलिसांनी क्रूरपणे गोळ्या झाडलेल्या पाहून त्याचे तरुण मन संतप्त झाले व देवळातील बांधकामाच्या विटा भिंतीआडून पोलिसांवर फेकण्यास त्याने सुरुवात केली. इन्स्पेक्टर आल्मेडाच्या द्वेषग्रस्त वर्तनाबद्दल आधीच माहिती मिळवली होती. त्यामुळे रामप्रसादाने कदाचित नेम धरून आल्मिडावर वीट फेकली असेल. इतरही काही तरुणांनी देवळाचा किल्ल्यासारखा उपयोग करून मारगिरी चालू केली असावी. त्यामुळे चिडून

जाऊन आल्मेडाने त्वेषाने देवळाकडे चाल केली. भितीच्या आडोशाला उभे राहिलेल्या रामप्रसादाला बाहेर खेचले आणि निर्दयपणे पिस्तूल झाडले. निर्भयतेचा बळी निर्दयतेने घेतला.

पण रामप्रसादाचे धैर्य, जिद्द व ताकद विलक्षण! बरगडी खालच्या जखमेवर हात दाबून तो लटपटत रस्ता ओलांडत समोरच्या बबन कासारच्या दुकानात गेला. त्याच्याकडून पाणी मागून घेऊन ते घटाघट प्यायला. त्याला जणू पाणी पिऊन पुन्हा लढायचे होते! त्यासाठी तो पुन्हा देवळाकडे परत आला. पण आता त्याच्या अंगी त्राण उरले नव्हते. रामाच्या देवळाच्या आवारात परत जाता क्षणीच रामप्रसाद भूमीवर कोसळला! विलक्षण-करुण व भीषण असे हे दृश्य! वैवाहिक जीवनाच्या उंबरठ्यावर असताना सतरा वर्षाच्या रामप्रसादाने साहसाने देशासाठी मृत्यूच्या दालनात झेप घेतली होती.

त्याच्या वडीलांनी या ज्येष्ठ पुत्राला नंतर पाहिले ते निःशब्द अवस्थेतच. त्याची नवपरिणीत वधू त्याला पाहूच शकली नाही!

**त्रैमासिक कर्नाळा मधील प्रकाशित लेख साभार.**

# हुतात्मा गोविंद गणेश ठाकूर, नांदगाव, ता. पालघर



**राष्ट्रीय संस्कारात वाढलेला आणि स्वातंत्र्य संपादन करण्याच्या ध्येयवादी वृत्तीने निश्चयपूर्वक नियपूर्वक मोर्च्यात सामील झालेला हा राष्ट्रसेवादलाचा तेजस्वी सैनिक नांदगावच्या गावड भंडारी समाजातल्या मजूर कुटुंबात १९२५ साली जन्मलेला, भावंडात पाचवा, त्यामुळे कुटुंबात स्थान थाकटे, पण ती उणीव गोविंदाने आपल्या गुणांनी भरून काढलेली होती. स्वभावाने तो फार साधा आणि मृदू वृत्तीचा होता. शेजारी पाजारी आणि शाळा सोबत्यांत तो सहज मिसळून जाई. अभ्यासातही हुशार होता. वर्गात नेहमी पहिल्या तीन क्रमांकात त्याचे स्थान ठरलेले. त्यामुळे राऊत गुरुजींचा नेहमी आवडता. खेळात, लेझिममध्येही भाग घेई. गणपती उत्सवासारख्या कार्यक्रमात गोविंदचा पुढाकार असे.**

हरी दामोदर राऊत हे त्या काळात नांदगावात प्राथमिक शिक्षक होते. राष्ट्रीय वृत्तीचे आणि कळकळीचे शिक्षक. त्यांची साधी राहणी, उदात्त विचार आणि निर्मळ जीवन हे गोविंदपुढे आदर्श होते. राऊत गुरुजींनी गोविंदच्या अंगचे गुण ओळखून त्यांची जोपासना केली. प्रभातफेरी, ग्रामसफाई, खादीप्रचार इ. राष्ट्रीय कार्यक्रमात गुरुजींबरोबर गोविंद उत्साहाने भाग घेई. त्यांचा सवंगड्यावर प्रभावही चांगला पडे. एका वर्षात त्याने १६० मुलांची संपूर्ण शाळा खादीधारी बनविली. त्याच्या अंगच्या नेतृत्व गुणांमुळे तो मुलांना एकत्र आणून संघटितपणे चांगली कामे करून घेई.

१९३८-३९ साली नांदगावला काँग्रेस सेवादल सुरू झाले. गोविंदचा त्यात पुढाकार होता. हळूहळू तो शाखाप्रमुख झाला. बोर्डीच्या महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस अधिवेशनास तो स्वयंसेवक म्हणून उपस्थित राहिला. १९४० साली नांदगावात झालेल्या मोठ्या प्रशिक्षण शिबिरातही तो सहभागी झाला होताच. राऊत गुरुजींमुळे त्याला साने गुरुजींच्या वाङ्मयाची आवड उत्पन्न झाली आणि हळूहळू तो त्यांचा भक्त बनला. यातून नांदगावच्या काँग्रेस सेवा दलाचे रुपांतर राष्ट्रसेवा दलात झाले. साने गुरुजींच्या विचारांनी गोविंदचे मन सदैव भारलेले असे. देशासाठी प्राणार्पण वृत्तीने कार्य करण्याची स्फूर्ती त्याला त्यातून मिळाली.

१४ ऑगस्ट १९४२ रोजी पालघर येथे निघालेल्या मोर्च्याच्या वेळी याच वृत्तीने तो नखशिखान्त भारला गेला होता. मोर्च्यासाठी प्रचार, माणसे जमविणे इ. कार्यात राऊत गुरुजींच्या बरोबर होता. गुरुजींवर त्याची अनन्य निष्ठा. त्यांच्या बरोबर देशकार्यासाठी निघण्यात त्याला आनंद वाटत होता. घरून बाहेर पडताना मनाशी त्याने काही निश्चय केलेला असावा. शाळेच्या दप्तरात त्याने आपल्या कुटुंबियांसाठी लिहून ठेवलेली चिठ्ठी मागाहून सापडली. तीमध्ये पुढील अर्थाचा मजकूर होता, **'आपला देश पारतंत्र्यात आहे. त्याला स्वराज्य मिळवून देण्यासाठी प्रत्येकाने झटले पाहिजे. मी याच कार्यासाठी जात आहे. कदाचित परत येणार नाही. माझ्याकरीता कोणी दुःख करू नये....'**

तेव्हा गोविंद सातवीत होता व त्याचे वय केवळ १७ वर्षाचे होते. पण विचाराने तो खूप पायऱ्या चढून वर गेला होता.

मोर्च्यात तो नांदगावातील लोकांच्या अग्रभागी होता. त्याचा मोठा भाऊ विनायक त्याच्याच रांगेत होता. पालघरमध्ये कचेरी रोडच्या नाक्यावर लाठीहल्ला सुरू होऊन गडबड उडाली तेव्हा गोविंद नाक्यापाशीच होता. कचेरीचा रस्ता लाठीधारी पोलिसांनी अडविला होता. पण गोविंदचा निश्चय पक्का होता. त्याने हातातील तिरंगी राष्ट्रध्वजासह कचेरी रस्त्यावर झेप घेतली आणि 'वंदे मातरम्'


अशी गर्जना करीत पोलिसांची साखळी तोडून पलिकडे जाण्यासाठी शर्थीची झटापट सुरू केली. त्याच्या हातातला ध्वज काढून घेण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला. पण तो ओरडला, 'मरेंगे, लेकिन छोड़ेंगे नहीं' ध्वज दोन्ही हातात घट्ट पकडून त्याने कावेरीच्या दिशेने जाण्याची पुनः निकराने धडपड केली. पण तो पोलिसांच्या चक्रव्यूहात पुरता अडकला होता. इतक्यात इन्स्पेक्टर आल्मेडाने जवळून झाडलेली गोळी त्याच्या डाव्या कुशीत बाणासारखी घुसून आरपार गेली आणि पोलिसांशी विरासारखा झुंजत असलेला गोविंद रणांगणावर खाली पडला. त्याच्या हातातला ध्वज कोसळताना त्याच्या अंगाखाली येऊन त्याच्या रक्ताने रंगून निघाला!

मृत्यू समीप असतानाही गोविंदचे धैर्य अभंग होते आणि निर्धार बळकट होता. त्याचे प्राण लगेच निघाले नाहीत. वेदनांनी कण्हत तो पाणी मागू लागला. चौकासमोरच्या चाळीत राहणारे पत्रकार मामा मराठे व त्यांचे शेजारी यांनी हे भीषण दृश्य पाहिले. गोविंदच्या वीरवेदना पाहून शं. ल. बापट सरांच्या पत्नीने पाण्याचा हंडा आणला. पाणी घेऊन मामा मराठे त्याच्याकडे निघाले. पण पोलिसांनी त्यांच्यावर बंदूक रोखून त्यांना पुढे जाऊ दिले नाही. अखेर दशरथसिंग ठाकूरांच्या मध्यस्थीमुळे गोविंदला पाणी मिळू शकले.

नंतर राऊत गुरुजींनी त्याला टांग्यातून माहीमच्या सरकारी दवाखान्यात नेले. पण खोल जखमेतून अतोनात रक्तस्त्राव होऊन संध्याकाळी ७ च्या सुमारास त्याने राऊत गुरुजीच्या मांडीवर मस्तक ठेवूनच प्राण सोडले! त्यापूर्वी तो गुरुजींना म्हणाला, 'गुरुजी, तुमच्या बरोबर राहिलो म्हणून मला हे भाग्य मिळाले. धन्य झालो!' त्याचे अखेरचे उद्गार 'वंदे मातरम्' हेच होते! असे कृतार्थ मरण फार थोड्यांच्या वाट्याला येते. ते भाग्य कुमार वयातच गोविंदला लाभले.

**त्रैमासिक कर्नाळा मधील प्रकाशित लेख साभार.**

# हुतात्मा रामचंद्र माधव (महादेव) चुरी, मुरबे, ता. पालघर



मोर्च्यात कामी आलेला हा सामान्य शेतमजूर वय सुमारे २५/२६ असावे. रामचंद्राचा जन्म मुरब्याचाच. भावंडात तो मोठा, त्यामुळे कुटुंबाजवळ स्वतःची शेती वगैरे काही नव्हते. सर्वांची उपजीविका मजुरीवर. त्यामुळे रामचंद्र जेमतेम सहीपुरते (पहिल्या इयत्तेपर्यंत) शिकला. पुढे मोलमुरीचीच कामे करु लागला.

नांदगाव - मुरबे भाग १९३० सालानंतर जागृत होऊन स्वातंत्र्य चळवळीत आलेला. रामचंद्रापाशी बौद्धिक विचार नव्हते. श्रद्धा मात्र होती गांधीबाबा आणि त्यांच्या कार्यकर्त्यांवर.

मोर्च्यापूर्वी १२ ऑगस्टला गावात बैठक होऊन बेत ठरला होता. त्या बैठकीला रामचंद्र हजर होता. १४ ऑगस्टला सकाळी ८॥, ९ वाजता भाकरी खाऊन सर्वांच्या बरोबर बाहेर पडला. घरी पत्नी व दोन मुलगे होते. मोठा मुलगा बाबू तेव्हा ६-७ वर्षाचा असेल. तो बिछान्यावर होता. 'बाबा जाताना माझ्या पाया पडून गेले, एवढेच मला आठवते' अशी आठवण हुतात्मा रामचंद्राचा मुलगा बाबू सांगतो. लक्ष्मण धाकटा भाऊ. त्याने रामचंद्राला प्रेमाची सूचना केली. सांभाळून जा. गडबड करू नको. कुणाची कुरापत काढू नको. इ. सांगितले. बस्स एवढेच नेहमीसारखे बोलणे.

दि. १४ ऑगस्ट १९४२ च्या पालघरच्या मोर्च्यात गंगाधर बुधाजी पाटील

हा १७ वर्षाचा  मुलगा त्याच्या जवळपास होता. चौक ओलांडून पालघर स्टेशनच्या दिशेने दोघे सरकले. तेवढ्यात गडबड झाली. लोक पांगले. काय झाले हे पाहण्यासाठी रामचंद्र मागे वळला. तेवढ्यात समोरून गोळी आली ती डाव्या खांद्याखालून निघून गेली. रामचंद्र खाली पडला. पडताना दुसरी गोळी पाठीत शिरली ती रामचंद्राला धारातीर्थी पाडूनच गेली. गंगाधर त्यावेळी झटकन रस्त्यालगतच्या (पोतदारांच्या) दुकानात शिरला म्हणून वाचला.

गोळीबार संपल्यावर स्वयंसेवकांनी पडलेल्या सर्वांना डॉ. सहस्रबुद्धेच्या दवाखान्याशी नेले. तेथे जाऊन गंगाधरने रामचंद्राचा मृतदेह ओळखला. नंतर देवीदिन तिवारी यांच्याकडून सायकल घेऊन गंगाधरने मुरब्यास जाऊन त्याच्या घरी दुःखवार्ता सांगितली. संध्याकाळी नथुराम पांडुरंग किणी यांनी टांग्यातून रामचंद्राचे शव त्याच्या घरी नेले. संध्याकाळी अंत्यविधी झाला.

रामचंद्राच्या बलिदानानंतर ५ वर्षांनी देशाला स्वातंत्र्य मिळाले. पण त्याचे कुटुंब मात्र पोरके झाले. पत्नी आजारामुळे ५-६ वर्षांनी वारली. मुलाचे शिक्षण रखडले. गुरे राखून तो पोट भरू लागला. देशासाठी ज्याने आपले प्राण सश्रद्धपणे अर्पण केले. त्याचे कुटुंब स्वातंत्र्य काळात उपेक्षितच राहिले.

**त्रैमासिक कर्नाळा मधील प्रकाशित लेख साभार.**

# हुतात्मा सुकूर गोविंद मोरे, शिरगांव, ता. पालघर

वस्तुतः सुकूर शिरगावचा नसून सालवडचा बोईसरपासून ३/४ मैलांवर असलेल्या या गावी त्याचा जन्म झाला. त्याच्या कुटुंबाचे घर आजही तेथेच असून त्याचे दामोदर इ. भाऊ तेथेच राहतात. सुकूरचे शिक्षणही तेथेच झाले जेमतेम तिसरी चौथीपर्यंत. वडील लवकर वारल्यामुळे शिक्षण सोडून सुकूरला लवकरच मोलमजुरी करावी लागली. सर्व कुटुंबाच्या उदरनिर्वाहास हातभार लावावा लागला.

१९४०-४१ मध्ये त्याचा विवाह झाला. शिरगावच्या पाटलांची मुलगी त्याला पत्नी म्हणून लाभली. ती स्वभावाने चांगली असल्यामुळे दोघांचे जीवन सुखासमाधानाने चालले होते. सालवडला कामधंदा मिळत नसल्यामुळे १९४२ मध्ये एप्रिलच्या आसपास दोघं शिरगावात भास्कर पाटलांच्या आधाराने येऊन राहिली. दोघेही स्वकष्टाने कमावून खात व नेकीने राहात.

सुकूरचे वय तेव्हा २४ वर्षांचे असावे. गडी अंगापिंडाने उंच व मजबूत होता. कामाला प्रामाणिक व कष्टाळू असायचा असे गावकरी सांगतात. शिरगावात राहायला आल्यावर सातपाटीच्या काही तरुणांच्या सहवासामुळे राष्ट्रीय वृत्तीचे वारे त्याला लागले. सातपाटीचे कार्यकर्तेच नित्य प्रचाराला येत. सुकूर त्यांचा अनुयायी व मित्र बनला. प्रभात फेऱ्या, मिरवणुका, सभा बैठकांमध्ये हजेरी लावू लागला. पत्नी विठाबाई कधी कधी त्याला अडवी. ''काम धाम सोडून जाऊ नका'' सांगे पण तो ऐकत नसे. काही बाबतीत त्याचा स्वभाव थोडा हट्टी असे. प्रसंगी तो रागावे, चिडे असे आज विठाबाई आपल्या आठवणी सांगते.

**१४ ऑगस्टलाही त्याने विठाबाईचे ऐकले नाही. विठाबाई तेव्हा बाळंतीण होती. 'अशावेळी तरी तुम्ही कुठे जाऊ नका' म्हणून तिने विनविले. पण सातपाटीहून मोर्चा पालघरला चालला होता. नेहमीचे मित्र बोलवायला आले.' 'जेवायला बसलेला अर्ध्यावरून उठवून नेला' अशी आठवण विठाबाईने डोळ्यात पाणी आणून सांगितली. जाताना घाईमुळे तिच्याशी शब्दही बोलला नाही.**

**विठाबाईचा भाऊ विश्वनाथही त्याच्याबरोबर गेला होता. मोर्च्यात सर्वांबरोबर रहायचे, सरकारी कचेरीवर जायचे, कचेरी ताब्यात घेऊन देश स्वतंत्र करायचा एवढेच त्याला कळत होते.**

मोर्च्यामध्ये पालघरच्या चौकातून स्टेशनकडे गेलेल्या मंडळीत सुकूर होता. मागे गडबड झालेली कळल्यावर काय झाले हे पाहण्यासाठी इतरांबरोबर तो मागे वळला, पण अल्पावधीत लोकांची पांगापांग झाली, हे कळलेच नसावे. समोरून गोळ्यांचा वर्षाव झाला. त्यातलीच एक गोळी सुकूरच्या छातीच्या वरच्या भागात गळ्याजवळ लागून सुकूरचे प्राण घेऊन गेली.

विश्वनाथ हे पाहून भेदरून गेला. संध्याकाळी ६ वाजता घरी जाऊन घडलेली दुःखद घटना सर्वांना त्याने सांगितली. सुकूरचा मृतदेह माहीमला उत्तर तपासणीसाठी नेला होता. रात्री ८ नंतर नथुराम किणी व वसंतराव मोगरे तो घेऊन शिरगावात आले. सर्व टांगा रक्ताने माखलेला होता. ते भेसूर दृश्य पाहून विठाबाई बेशुद्ध झाली. सर्व गावकरी या अघटित प्रकाराने भयभीत झाले होते. अंत्यसंस्कारासाठी लोकांना मन वळवून बोलावून आणावे लागले.

सुकूर हा केवळ सामान्य शेतमजूर, गरीब आणि अल्पशिक्षित. पण परिसरातील जनतेच्या उठावाने त्याच्याही अंगी स्वातंत्र्यप्रेमाचे वारे संचारले होते. **तरुण नवविवाहीत पत्नी व लहान मूल यांच्या प्रेमपाशापेक्षा देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे कार्य थोर मानून त्यासाठी उठावात तो सामील झाला.** जीवनाच्या आरंभकाळीच सर्वस्वावर पाणी सोडून देशासाठी हौतात्म्य पत्करलेला तो एक सश्रद्ध युवक होता. १९७२ पासून विठाबाईला शासनाकडून कृतज्ञता वेतन मिळू लागले.



# हुतात्मा अण्णा एगमंद्राप्पा पत्रावळे

सांगलीचा तुरुंग फोडून पळून जाण्याचे साहस १६ क्रांतिवीरांनी केले. दि. २३.७.१९४३ दिवस या १६ जणांना अंघोळीसाठी बेड्या सोडून ज्या वेळी बाहेर आणले गेले तेव्हा त्यांनी सांकेतिक भाषेत एक विशेष निरोप हस्ते परहस्ते पसरविला. 'उद्या दुपारी आपण तीनच्या सिनेमाला जायचं आहे' याचा अर्थ त्यावेळी सर्वांना तुरुंगातून पळून जायचे, असा होता. बाजारच्या दिवशीच हे सर्व क्रांतीकारक तुरूंगातून पळाले. त्यांचा पाठलाग १०० पोलीस व काही घोडेस्वार करीत होते, पोलिसांच्या गोळीबारात अण्णा पत्रावळे हुतात्मा झाले.

अण्णा पत्रावळे तर साधा पंचविशीतला पोरगा, त्याने लढ्यात घेतलेला भाग, त्याला झालेली अटक, त्याची स्थानबद्धता, त्याला तुरुंगाबाहेर काढण्याचा पहिला प्रयत्न, दुसऱ्यांदा तुरुंगातून त्याच्या सहकाऱ्यानिशी त्यानं केलेलं पलायन व त्यांत त्याचा झालेला अंत या गोष्टी लोकांना बऱ्याचशा आठवणीत असतील. पण अण्णा पत्रावळेची एक आठवण सहज येथे देत आहे.

बेचाळीस सालच्या ऑगस्टची तेरा अगर चौदा तारीख असेल. विलिंग्डन कॉलेजवरील मीटिंग संपवून आम्ही काही मित्र रेल्वेने परत येत होतो. उसळलेल्या लढ्यांत हूड तरुणही आपल्या परीनं ब्रिटीश वस्तूंचा विनाश करायचा म्हणून रेल्वे मधेच थांबव, गाडी अडव वगैरे प्रकार करीत होते. गाडी त्यामुळे मधेच थांबली होती. बिचारा गार्ड घाबरा घुबरा झाला होता; पण त्याला गाडीची नासधूस दिसत असली तरी आपल्याला त्रास होणार नाही याची खात्री होती..

त्यावेळी एक तरुण निमगोरा पोरगा आमच्या डब्यांत शिरला. उत्साह त्याच्या चेहऱ्यावर भरून ओसंडत होता. त्यानं सभोवती पाहिलं. उतारुंनी

खिडक्यांच्या काचा वर केल्या होत्या. वर आलेल्यापैकी कोणी काही, कोणी काही करुन डब्याची नुकसानी करण्याचा प्रयत्न होते. कुणी दगडांनी कुणी काठ्यांनी!

पण त्यातील एकाने खिडकीच्या काचेवर आपल्या मुठीचा प्रहार केला. त्यासरसी काचेच्या चिंधड्या निधड्या उडाल्या आणि त्याच्या मुठीतून रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या; पण त्याची पर्वा न करता त्यानं आपली मूठ दुसऱ्या काचेवर मारली. मी त्याचा हात तसाच धरला आणि विचारलं, ‘अरे, तुझ्या हाताची जखम तर पहा......!’

त्यानं तशाच अवस्थेत माझ्याकड पाहिलं आणि म्हणाला, ‘अहो मिस्टर, आपले हात, आपलं शरीर, आपले प्राण पाहत बसायचे हे दिवस उरले नाहीत.’

अण्णा पत्रावळे यांचा जन्म दि. २२-११-१९२५ रोजी हातकणंगले येथे त्यांचे आजोळी जैन घराण्यात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव श्री. एगमंद्राप्पा व्यंकाप्पा व आईचं नाव सौ. इंदिराबाई.

यांचे शिक्षण सांगली येथेच झाले. अण्णा मराठी ७ वी पास झाल्यानंतर त्यांनी सांगली हायस्कूलमध्ये प्रवेश केला. ते जात्या कुशाग्र बुद्धीचे असल्यामुळे त्यांनी आपल्या विशेष गुणांवर हायस्कूलची शिष्यवृत्ति प्रारंभापासून मिळविली होती. लहानपणापासून त्यांना व्यायामाची विशेष आवड असल्याने त्यांची शरीरयष्टी पिळदार नि सतेज बनली होती. बाणेदार वृत्ती व अभ्यासात नेहमी वरचा क्रमांक यामुळे विद्यार्थ्यांना तसेच शिक्षकांनाही आवडते झाले असल्यास नवल नाही. याच वेळा राष्ट्रीय पुढाऱ्यांची स्फूर्तिप्रद चरित्र वाचण्याची आवड वाढून त्यांच्या अंतःकरणात राष्ट्रप्रेम जागृत झाले होते. पुढील त्यागमय क्रांति-जीवनाची बीजे याच काळात रुजली गेली. त्यांचे घराणे धार्मिक प्रवृत्तीचे असल्यामुळे अण्णांच्या बाल मनावर चांगले संस्कार झाले होते. विद्यार्थीदशेत असताना ते नियमित स्वाध्याय करीत व चातुर्मासात घरी पुराण वाचून दाखवीत. गोरगरिबाविषयी नेहमी प्रेमळ भावना ठेवीत.

इंग्रजी ४ थी ची वार्षिक परीक्षा जवळ येऊ लागली तरी अण्णांचे लक्ष अभ्यासाकडे काही केल्या लागेना. १९४२ च्या फेब्रुवारी महिन्यांत ‘हरिजन

साप्ताहिक' मधील म. गांधीजीचे 'निवडक वेचे' छोटया पुस्तक रुपाने प्रसिद्ध झाले होते. ते पुस्तक अण्णांनी पुनः पुनः वाचून काढल्यामुळे त्याच्या मनावर देशाच्या स्वातंत्र्याविषयी उत्कट परिणाम होऊन जीवनाची दिशा बदलली. त्यातील 'चले जाव' ची घोषणा व महात्माजींनी देशासाठी तरुणांना दिलेली हाक ऐकली आणि त्यांनी गांधीजींच्या हाकेला ओ देणे हे प्रत्येक तरुणांचे कर्तव्य आहे हे जाणून या स्वातंत्र्यलढयात उडी घेण्याचा त्याचवेळी दृढ निश्चय केला.


स्वातंत्र्य लढयांत भाग घेतल्यास प्रसंगी आपणांस तुरुंगवास भोगावा लागेल. त्यावेळी घरच्यासारखे चांगले अन्न मिळणार नाही हे जाणून त्यांनी त्या दिवसापासून तांदूळ व गव्हाचे अन्न वर्ज्य केले. घरी आई वडील अण्णांची जेवणासंबंधी जेव्हा चौकशी करीत तेव्हा गोरगरिबांना जोपर्यंत चांगले भरपूर अन्न मिळणार नाही तोपर्यंत आपण गरिबांचे साधेच अन्न खाणार असे अण्णा उत्तर देत. अण्णांची वार्षिक परीक्षा १९४२ एप्रिलमध्ये सुरु झाली. त्यांनी सर्व पेपर्स नेहमीप्रमाणे लिहिले; पण प्रत्येक पेपरच्या शेवटी महात्माजींचा 'करेंगे या मरेंगे' हा दिव्य संदेश ठळक अक्षरांत लिहिला होता. पुढे प्रत्यक्ष लढ्यांत त्यांनी भाग घेतला व सांगलीच्या तुरुंगातून आपल्या सहकाऱ्यानिशी निसटून जात असता त्यांना हौतात्म्य आले.

अंतसमयी श्री. अण्णांनी भारतमाता व म. गांधीजींचा जयजयकार करुन हसतमुखाने आपला देह भारतमातेच्या चरणी ठेवला. श्री. अण्णा पत्रावळे यांच्या निधनानंतर सांगलीच्या एका चौकास, हुतात्मा अण्णा पत्रावळे' असे नामभिधान करण्यांत आले आहे.

**त्रैमासिक कर्नाळा मधील प्रकाशित लेख साभार.**

# इंदुभूषण : एक कोवळे बलिदान

**हिंदुस्थानच्या स्वातंत्र्ययुद्धात अंदमानची फळी लढविणाऱ्या ज्या देशभक्तांना ब्रिटिश अधिकाऱ्यांनी छळाने प्राणत्याग करावयास लावले त्यातील एक हुतात्मा इंदुभूषण.**



इंदुभूषणला मुली सांगून येत होत्या. कारण तो आता शालान्त वर्गात गेला होता. खुलना येथील प्रशालेत त्याचे शिक्षण चालू होते.

इंदुभूषणच्या मनात लग्न करण्याचे नव्हते. आणखी शिकावे असे त्याला वाटत होते. जितक्या आग्रहाने त्याचे मातापिता त्याला लग्नाविषयी सांगत होते तितक्यात निग्रहाने तो आपला लग्न इतक्यात न करण्याचा विचार त्यांना पटविण्याचा प्रयत्न करीत होता.

बंकिमचंद्राचे 'आनंदमठ' त्याच्या वाचनात आले होते. बंगालची फाळणी हा त्या काळचा ज्वलंत प्रश्न होता. 'युगान्तर', 'वंदे मातरम' इत्यादी वृत्तपत्रे तरुणांना प्रोत्साहित करणारे अग्रलेख लिहीत होती. तेही तो वाचीत असे. त्याचे मन देशप्रेमाने भरु लागले होते. आपले जीवन देशाच्या कामी यावे ही त्याची भावना मूळ धरू लागली होती.

इंदुभूषण अवांतर वाचनात इतका रंगून गेला होता की शालान्त परीक्षेकडे त्याचे दुर्लक्ष झाले आणि तो अनुत्तीर्ण झाला. दुसरीकडे राहावे या विचारात तो

होता. त्याची बारींद्र कुमार घोष या क्रांतिदूताशी गाठ पडली.

इंदुभूषण माणिकताला परिसरात राहण्यास गेला. सर्व क्रांतिकारकांचा स्फूर्तिस्रोत गीता आहे. इंदुभूषणची श्रद्धा बळावली. चाफेकर बंधू फाशी गेले तेव्हा त्यांनी गीता आपल्या हातात ठेवली होती. हे त्याच्या वाचनात आले होते. ८ मे १८९९ आणि १२ मे १८९९ या दिवशी वासुदेव आणि बाळकृष्ण या चाफेकर बंधूंना येरवडा बंदिगृहात फाशी दिल्याचे त्याने वाचले होते.

अशोक नंदी हा इंदुभूषणचा मित्र झाला. तोही त्याच्यासारखा १६/१७ वर्षाचा होता. त्याला अभिमान वाटावा असे त्याचे आणखी एक श्रद्धेय स्थान झाले होते. तो मुलगा होता १५ वर्षाचा सुशील.

२६ ऑगस्ट १९०७ या दिवशी कलकत्ता येथील किंग्जफोर्ड सेशन्स जज्जच्या न्यायालयात 'युगांतर'चे संपादक अरविंद घोष यांच्यावरील अभियोग चालू होता. बिपिनचंद्र पाल यांना अरविंद विरुद्ध साक्ष देण्यास भाग पाडले जात होते. बाहेर आणि न्यायालयातही गर्दी लोटली होती..

बिपिनचंद्र पाल यांनी साक्ष देण्यास नकार देताच त्यांच्यावर तत्काल न्यायालयाचा अवमान केल्याचा अभियोग करून सहा महिन्याची शिक्षा सुनावली गेली. बाहेरील गर्दीने वंदेमातरम् घोषणांनी वातावरण दुमदुमून सोडले.

गोरे सार्जंट आले. त्यांनी आपल्या आरक्षीच्या पथकाला लाठी मारण्याचा आदेश दिला. लाठीच्या प्रहारांनी लोकांचे रक्त वाहू लागले. एक सार्जंट स्वतःच दांडके घेऊन लोकांना उभे आडवे मारत सुटला होता.

पंधरा वर्षाचा सुशील सेन त्या गर्दीत होता. फिरंग्याचा तो मोकाट लाठीमार त्याच्याने बघवला नाही. त्याने समोर जाऊन त्या उंचपुऱ्या गोऱ्याला तडाखा

हाणला. पुन्हा एकदा! आणखी एक!

गोरा सोजिर तो चमत्कार बघतच राहिला. शरीराने तो धिप्पाड होता. सर्व इंग्रजी साम्राज्याचे बळ त्या गोऱ्याच्या पाठीशी होते. पण हे पोर आपल्या इवल्याशा शक्तीने त्या साम्राज्यावरच प्रहार करू धजत आहे हे कसे काय? आरक्षी सहाय्याला आले. सुशील कुमारला खाली पाडले.

दुसरे दिवशी सुशीलला न्यायालयात उभे केले. २७ ऑगस्ट १९०७ हा तो दिवस होता. आपल्यावर आक्रमण म्हणजे हल्ला केल्याचा अभियोग त्या गोऱ्या सार्जंटने सुशीलवर भरला होता..

किंग्जफोर्डने त्या कोवळ्या मुलाला स्पष्टीकरण विचारले. तो म्हणाला, ''मी अपराधी आहे किंवा नाही मला ठाऊक नाही. सियाल्डावरुन मी येत होतो. लाल बाजारापाशी मला मोठा घोळका दिसला. काय आहे हे बघायला मी तेथे गेलो. तेवढ्यात हा गोरा दिसेल त्याला वाटेल तेथे फटके मारीत सुटलेला दिसला. मी त्याचे फटके परतवले, मग तो मलाच आणखी मारायला लागला. त्याला प्रत्युत्तर म्हणून मी माझ्या हातांनी ठोसे मारीत बांबू लागलो. आणखी काही आरक्षी आले. त्यांनी मला खाली पाडले, मारले.''

न्यायाधीशाने सुनीलला पंधरा फटक्यांची कठोर शिक्षा सुनावली, धीरोदात्त मनाने सुशीलने शिक्षा भोगली. वृत्तपत्रांनी शासनावर आग पाखडली. सुशीलच्या धीरगंभीर वर्तनाना लोकांनी उत्स्फूर्त गौरव केला. सुशील! सुशील! सर्व बंगालचे ते श्रद्धास्थान झाले. माणिकतालाचा तो परिसर क्रांतिकार्याचा अड्डा बनला. कन्हैयालाल दत्त, सत्येंद्रनाथ बोस आदि क्रांतिकारकांनी मोठा गट जमविला.

किंग्जफोर्ड या न्यायाधीशाला जगू देता कामा नये, अशी योजना आखली गेली. त्याच्या क्रूर निर्णयामुळे शासनाला त्याच्या सुरक्षिततेची चिंता वाटली

म्हणून त्याला २८ मार्च १९०८ या दिवशी मुझफ्फरपूरला स्थलांतरीत केले.

दिनेशचंद्र रे आणि खुदीराम बोस यांनी २० एप्रिल १९०८ या दिवशी किंग्जफोर्डच्या बग्गीवर बॉम्ब टाकला आणि ती बग्गी त्याची नव्हती. केनेडी नावाच्या दोन बाया त्यात मेल्या होत्या.

दिनेशचंद्रला पकडताना त्याने स्वतःवर गोळी झाडून घेतली. त्याची ओळख नंतर अफुल्ल कुमार बाकी (रंगपूर) अशी पटली होती. खुदीराम बोस पकडला गेला. त्याच्यावर खटला चालला आणि ११- ८-१९०८ ला मिदनापूर बंदिगृहात त्याला फाशी दिले.

पण दिनेश (प्रफुल्ल) आणि खुदीराम यांच्या धरपकडीनंतर सर्वत्र धरपकड़ झाली आणि मे २, १९०८ या दिवशी मुरारीकपूर मार्ग, माणिकलाल बाग, राजा नाभी किसन मार्ग, गोपी मोहनदत्त लेन, हॉरसन रोड, देवगड इत्यादी ठिकाणी झडत्या झाल्या. अनेक कागदपत्रे, रसायने मिळाली. छरिका, गोळ्या मिळाल्या. एकेचाळीस तरुणांना अटक झाली.

'अलीपूर कट' या नावाने ३८ तरुणांवर दोन तुकडीत खटला भरला गेला. इंदुभूषण त्यातील पहिल्या तुकडीत आरोपी होता.

त्याच खटल्यात नरेंद्र गोस्वामी हा क्षमेचा साक्षीदार झाला होता. तो बंदिगृहात होता. कन्हैयालाल दत्त आणि सत्येंद्रनाथ बोस यांनी त्याला गोळ्या घालून ठार मारले.

अलीपूर कटाच्या खटल्याचा निर्णय ६ मे १९०९ या दिवशी लागला. इंदुभूषणला दहा वर्षे काळेपाणी शिक्षा झाली. सहा महिन्यांनी म्हणजे डिसेंबर १९०९ मध्ये इंदुभूषणची अंदमानला पाठवणी झाली. अंदमानला पहिले पहिले

‘बमगोलेवाले’ गेले त्यात इंदुभूषण होता.

नाव, वय, जात, धर्म इत्यादी नोंदणी झाली. उंची, वजन नोंदले गेले. आलेल्या दंडितांना प्रथम कोलूतील (तेलाच्या घाण्यातील) जवसाप्रमाणे किंवा खोबऱ्याप्रमाणे पिसून काढायचे म्हणून कोलूवरच त्यांची पाठवणी असे. सिंधी मुसलमान आणि पठाण आपल्या चापलुसी वागणुकीने अधिकाऱ्यांशी जवळीक साधत असत. त्यांना अधिकारांची प्रतीके दिली जात. म्हणजेच त्यांना तांडेल बनविले जाई. क्रूरपणा करने हे नियतका (डबूटी) समजले गेल्याने स्वतः नाही लभ्यांश साधण्यासाठी हे पठाण मुसलमान त्या क्रूरपणाचे उतू जाणारे अवलंबन करीत असत.

ज्याचे शारीरिक बळही कोलू रेटण्याचे असणे शक्य नव्हते त्या इंदुभूषणला कोलूवर धाडले गेले.

कधी कोणाच्या साहाय्याने, तर कधी स्वतः तो कोलू हलविण्याचा प्रयत्न करीत राहिला. तांडेलांना नेहमी मारा करण्यासाठी काही दुबळे दंडित लागत असत. त्यातच एक इंदुभूषण होऊन गेला.

पंधरा दिवसांनी त्याची छिलका (नारळाची सोंडे) कुटण्याच्या कामावर पाठवणी झाली. कदन्न आणि अतिश्रम यांनी इंदुभूषण अत्यंत दुबळा झाला.

इंदुभूषण मर्यादित शिक्षेचा दंडित असल्याने त्याची बाहेरच्या कामावर पाठवणी केली गेली. बाहेरचे काम राजवंद्यासाठी तितकेच कष्टप्रद निवडले जाई.

इंदुभूषणच्या वाट्याला क्वचित विश्राम येत असे. तो आजारी असायला आणि त्याचवेळी डॉक्टरने त्याला तपासायला गाठ पडली, आणि डॉक्टरची मनःस्थिती या बंद्याला खोटे ठरवावे अशी नसली तर इंदुभूषणला रुग्णालयात प्रविष्ट करून घेतले जाई..

बंगालमधून आणि अन्य प्रांतातूनही एकामागून एक राजबंद्यांचे जथे अंदमानात येऊ लागले होते. पंजाब, महाराष्ट्र आणि मद्रास प्रांतातूनही राजबंदी आले होते. अधिकाऱ्यांनी त्या एकमेकांपासून फोडून ठेवावयाचे म्हटले तरी त्यांना शक्य होत नसे.

एकमेकांना धीर देणे, शक्यतेप्रमाणे कामाला साहाय्य करणे, अधिकाऱ्याशी अधिकारासाठी भांडताना एकत्र येणे, हे नित्याचे घडू लागले. पण एकेकाला फोडून त्याला छळायचे हा अधिकाऱ्यांचा मार्ग असे.

दोन वर्ष होऊन गेली होती. सर्वच दिवस कष्टात जात होते. बाहेरच्या कामावर असताना इंदुभूषणच्या हाताला एकदा जे फोड आले त्यात विषबाधा झाली. त्याच्या हाताला असह्य वेदना होऊ लागल्या.

काम बदला म्हणून इंदुभूषण विनवू लागला. बाहेर काम असे तेव्हा बाहेरच एक रुग्णालय असे. तेथील डॉक्टर दाद देईनात. मला आत पाठवा असे इंदुभूषणने सांगितले. त्याला आत आणले पण ते खोलीत पडून राहण्यासाठी नव्हे.

सावरकरांनी त्याची चोरुन भेट घेतली. मला आता जगणे असह्य झाले आहे असे इंदुने सांगितले. देता येणे शक्य होते तेवढा धीर सावरकरांनी दिला. इतर राजबंद्यांनीही तसा धीर दिला. पण दहा वर्षे काढणे. माझ्याच्याने होणार नाही. या यातनातून मी स्वतः सुटका करुन घेतली नाही तर मध्यंतरीच केव्हातरी मृत्यू मला गाठेल. त्या वेळेपर्यंत मी प्रतीक्षा का करावी, असा त्याचा हट्ट असे.

बंदिपालाने इंदुभूषणची स्थिती पाहिली पण ती सहानुभूती दाखविण्यासाठी नव्हे, तर त्या व्याधीग्रस्त हातांना वेदना देणे शक्य होईल या विचाराने.

''तुला आत येऊन आराम करावयाचा आहे. काय?'' बंदिपाल बारीने दरडावले. ''मला डॉक्टरकडे न्या.'' इंदुभूषण म्हणाला. ''मी ते जाणत नाही.'' असे म्हणून बारीने तांडेलाला सांगितले, ''याला कोलूवर (तेलाचा घाणा) न्या उद्यापासून.''

इंदुभूषण खोलीत बंद झाला. आजवर असे तसाच तो एकटा होता. पण आज त्याला एकटेपणाची आणखी एक प्रचीती आली.

स्वतःचेच चित्र इंदुभूषण बघू लागला. प्रथम कोलूचा परिचय, हाताला आलेला फोड, कोलूचा दांडा हालत नाही म्हणून दांडयालाच लोंबकळून फरफटत जाणे. संध्याकाळी अंगावर खोबऱ्याचा भुसा, कधी सदरा असलेला तर कधी उघडेच. तेलाची जड बादली वाकत वाकत त्या कोठीपर्यंत– गुदामापर्यंत न्यायची. पुन्हा बंद होण्यासाठी खोलीत जायचे. विटा वाहण्याचे बाहेर मिळालेले काम.. पाण्याचे हंडे नेण्याचे काम. सर्व काही जीवापलीकडील, त्याच्याजवळील काही पुस्तके होती. त्यात रमण्याइतके शरीरस्वास्थ्य त्याला कधीच मिळाले नाही.

उद्या कोलू! त्या विचाराने तो पुन्हा भानावर आला. त्याने हाताकडे पाहिले. विषबाधा होऊन चिरलेले हात! या हातांनी कोलू रेटणे शक्य आहे काय? आणि तो रेटला जात नाही म्हणून पाठीवर फटके. मानवाने केलेली मानवाची ही स्थिती स्वातंत्र्य संपादन करण्यासाठी हे मूल्य! हे सतीचे वाण! हे असिधारा व्रत!

संपले! तो म्हणाला, ''बारी! उद्या कोलू चालेल तुझा. मी नाही चालविणार. पुष्कळ नवे नवे क्रांतिकारक येत राहतील. हा झरा अखंड चालू राहील. स्वातंत्र्य मिळेपर्यंत.''

त्या हातानीच त्याने पुस्तकाचे कोरे पान फाडले. एक पेन्सिलचा तुकडा त्याने मिळविला होता. लिहून ठेवले– दिनांक २९/४/१९१२ मला अत्यंत अमानुष वागणूक मिळाली आहे. 'मी स्वतः होऊन मरावे अशी अधिकाऱ्यांनी स्थिती आणली आहे. माझ्या हातावरील दुखापती बघाव्यात.' इंदुभूषण.

इंदुभूषणने आपल्या दुसऱ्या हातांनी पायाच्या साहाय्याने सदरा फाडला. त्याच्या लांब धांदोटया गाठविल्या. एक दोरी केली. बाहेर रात्रीचा पाहारेकरी दूर आहे असे पाहिले. दोरीचे एक टोक मागील खिडकीच्या गजातून काढले. त्याला गाठ दिली. आपल्या गळ्याला पुरेल इतपत लांबी ठेवली. फास केला. पायाखाली लोखंडी थाळी आणि भांडे ठेवले. हाताने वरचा दोर लोंबकळल्यासारखा धरून ठेवला आणि सर्व काही ठीक आहे याची निश्चिती पटतान पायाने थाळी दूर सरकवून दिली. हात ढिला पडला. इंदुभूषण लोंबकळत राहिला. क्षणार्धात त्याचे प्राणोत्क्रमण झाले.

बारी बंदिपालने इंदुभूषणने गळ्यापाशी दोरीला बांधून ठेवलेली चिठ्ठी पुढे आणली नाही. थिऑसॉफीचे एक पुस्तक खोलीत होते. त्या पुस्तकाचा आधार घेऊन बारीने ठोकून दिले, थिऑसॉफी वाचून डोके फिरल्याने इंदुभूषणने आत्महत्या केली.

आमचे तथाकथित राष्ट्रीय पुढारी अशा रक्ताचे ऋणी राहिले नाहीत ही इंदुभूषणसारख्या तरुणाच्या आत्मयज्ञाची सर्वात क्रूर शोकांतिका आहे.

**त्रैमासिक कर्नाळा मधील प्रकाशित लेख साभार.**

# स्वातंत्र्य संग्रामातील धगधगता तारा
# शिरीषकुमार मेहता



**प्रथम मुलींच्या दिशेने गोळीबार सुरू झाला, आणि लहान लहान मुलींच्या आरोळ्यांनी, आक्रोशांनी आसमंत भरून उरला. या परिस्थितीत शिरिषकुमार हाती तिरंगा घेवून तीरासारखा धांवला, त्याच्या अंगात माँ भवानीचं बळ संचारलं होतं. त्या कोवळ्या वीरांनी गोळीबाराचा आदेश देणाऱ्या अधिकाऱ्याची निर्भत्सना केली. त्याला दटावलं, ''नामर्दासारखे मुलींवर काय बंदुक चालवता? खबरदार गोळ्या घालाल तर'' हे उद्गार घुमले मात्र!**

आज स्वातंत्र्याला तब्बल ७५ वर्षे झाली, आपण जणु सोयिस्करपणे विसरूनच चाललोय स्वतःच्याच मीपणाच्या जाणीवेत कि आज आपण जे स्वातंत्र्य उपभोगतोय ते मिळण्यापूर्वीची परिस्थिति काय होती? आजच्या नवयुवक आणि तरुण विद्यार्थ्याच्या संदर्भात विचार करतां, स्वातंत्र्याच्या बलिवेदीवर हंसत हंसत कोवळं तारुण्य कुर्बान करणारे चाफेकर बंधु, अनंत कान्हेरे अनेक बंगाली तरुण आणि अगदी शाळकरी गणला जाणारा नंदुरबारचा शिरिषकुमार मेहता आणि त्याचे सवंगडी. हे सर्व असे कसल्या मातीचे बनले होते हो? असा कसला चढला होता कैफ सर्वांना, की ज्यासाठी आई, वडिल इतर आप्तजन, स्वतःच भविष्य कशाकशाचाही विचार न करता त्यांनी फांसावर जावे अथवा उघड्या छाताडावर ब्रिटिश सोजिरांच्या गोळ्यांचा वर्षाव झेलावा.

खरच, इतिहासाचं अवलोकन करतां एका गोष्टिचं भान मात्र होतं, काळाचं! होय काळाचच!! तो काळच असा होता, नेतृत्वच असं अस्सल सोन्यासारखं बावन्नकशी होतं. मातृभूमीवरुन जीव ओवाळून टाकायला अगदी चढाओढच लागली होती, जशी आजच्या नेतृत्वाची देश विकून खायला लागलेय.

१८५७ साली पेटून उठलेला हिन्दुस्थान खरच तब्बल ९० वर्ष तसाच धगधगता ठेवण्याचं कार्य एकापेक्षा एक अव्वल राष्ट्रभक्तांनी केलं.

लोकमान्य टिळकांनी सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार केला. त्यांच्या निर्वाणानंतर महात्मा गांधींनी लढयाची सूत्र जणु आपल्याकडे घेतली आणि लढा अधिकच व्यापक केला. स्वदेशीच्या चळवळीत सामान्यातला सामान्य सुध्दा अगदी आपसुकच राष्ट्रप्रेमापायी खेचला गेला. प्रत्येकाला स्वतःपेक्षा राष्ट्र मोठे आहे याची जाण झाली होती. महात्माजींचे अनेक अनुयायी, कार्यकर्ते एकापेक्षा एक निस्पृह आणि विशाल अंतःकरणाचे खंदे लढवय्ये होते. हे मान्य करावेच लागेल.

एखाद्या महामारीने बघता बघता संपूर्ण देश व्यापावा, घराघरांत साथ पसरावी आणि घराघरांतून रुग्ण असावेत, अगदी तसा हा स्वातंत्र्यप्राप्तीसाठी ङ्क्ष्मारु अथवा मरूङ्क्ष्ङ्क्ष या मंत्राचा घोष करीत अगदी लहानसहान अमोर, गरीब, अबालवृध्द पेटून उठला होता. स्वातंत्र्यसंग्रामात सर्वात जास्त सहभाग बंगाली आणि मराठी व खालोखाल पंजाबी क्रांती वोरांचा होता. गांधीच्या विचारसरणीच्या प्रभावाखाली आलेला एक नेता म्हणजे सानेगुरुजी, एक आदर्श शिक्षक, एक हाडाचा शिक्षक, आपले विद्यार्थी हे आदर्शच असले पाहिजेत असे एकमेव ध्येय उराशी बाळगणारा शिक्षक. त्यांनी आपलं कार्यक्षेत्र केलं खानदेश. घराघरात, विद्यार्थ्या विद्यार्थ्याच्या हृदयाला स्पर्श करून देशप्रेम जागवलं आणि

मकरेंगे या मरेंगेफ या निर्णयापर्यंत त्यांना नेवून ठेवलं या शिक्षकानी. 'मृत्यू' म्हणजे खर काय असतं हे कळण्याच वय नसलेल्या विद्यार्थ्यांना देखील स्वातंत्र्य लढ्यासाठी तयार केलं. त्याच विद्यार्थ्यामध्ये एक होता, शिरिषकुमार मेहता, वय होतं उगंपुर १५ वर्षांचं (आजच्या परिस्थितीचा विचार करून सांगायचं तर पॉकेटमनी घेऊन आई वडिलांना लुटायचं आणि घरी आल्यावर टी.व्ही. ला डोळे लावून बसायचं वय.) ९ सप्टेंबर १९४२ ला नंदुरबारमध्ये एक मोर्चा निघाला, विद्यार्थ्यांचा मोर्चा, आघाडीला हा खंदा वीर हातांत तिरंगा लहरवत, घोषणा देत आपल्या बाल सवंगड्याना आगे बढो साठी चैतन्य प्रदान करीत होता. हा बालवीरांचा मोर्चा पहायला अवघं नंदुरबार लोटले होतं. माणिक चौकात झेन्डावंदनासाठी मोर्चा कूच करीत निघाला होता. पण त्याची भव्यता पाहून, त्या चिमुरड्यांचा जोश, त्याचा बाकी नागरिकांवर होणारा परिणाम आणि त्याची हाक घातलेली परिणिती, या सगळ्यांचा विचार करता ब्रिटिश अधिकाऱ्यांना न मानवणारीच परिस्थिती होती. त्यांनी मोर्चा अडविण्याचा प्रयत्न केला. नागरिक आणि सोजिरांमध्ये संघर्ष पेटला. मोर्चा आणि इतर नागरीक तसुभरही मागे व्हायला तयार नव्हते. त्यातच कुण्या एका नागरिकाने एका ब्रिटीश अधिकाऱ्याला भोसकले. ब्रिटीशांची माथी भडकावला एवढसं कारण पुरे होतं त्यांनी गोळीबार सुरू केला. प्रथम मुलींच्या दिशेने गोळीबार सुरू झाला, आणि लहान लहान मुलींच्या आरोळ्यांनी, आक्रोशांनी आसमंत भरून उरला. या परिस्थितीत शिरिषकुमार हाती तिरंगा घेवून तीरासारखा धांवला, त्याच्या अंगात माँ भवानीच बळ संचारलं होतं. त्या कोवळ्या वीरांनी गोळीबाराचा आदेश देणाऱ्या अधिकाऱ्याची निर्भत्सना कोली. त्याला दटावलं, ''नामर्दासारखे मुलींवर काय बंदुक चालवता? खबरदार गोळ्या घालाल तर'' हे उद्गार घुमले, मात्र ! पोलिस बेभान झालेलेच होते, हाती सज्ज बंदुका होत्या, सन् सन् करीत गोळ्या सुटल्या, पायाला गोळी लागताच शिरीषकुमार कोसळला. खाली कोसळता कोसळता वन्दे मातरमचा घोष सारखा सुरू होता. दुसऱ्या गोळीने शिरिषकुमारच्या छातीचा वेध घेतला. गोळी छातीच्या आरपार गेली आणि वन्दे मातरम् चे शब्द तसेच राहिले. त्याचे इतर सवंगडी, धनसुखलाल,

घनःश्यामदास, वाणी, लालदास आणि केतकर वगैरे धांवून आले ते ही एकापाठोपाठ एक धारातीर्थी पडले. या नंदुरबारच्या महाभारताच्या धर्मयुध्दात पांच अभिमन्यु धारातिर्थी पडले होते. ह्या कोवळ्या हौतात्म्याने सारा हिन्दुस्थान दुःखसागरात बुडुन गेला. धन्य ते मातापिता, धन्य ते राष्ट्र जेथे एवढ्या कोवळ्या वयांत मुलांना जाण आली ती राष्ट्रप्रेमाची. सानेगुरुजी, महात्मा गांधी आणि अवघा खानदेश शोक मग्न झाला..

शिरिषकुमारच्या बलिदानाने अवघा खानदेश पेटून उठला, स्वातंत्र्याचा लढा अधिकच उग्र बनला. रेल्वे अडवणे, रुळ उखडणे, फोनच्या तारा तोडणे, ब्रिटिश कचेरींवर दरोडे घालणे वगैरे प्रकार सर्रास होऊ लागले. काश्मीर ते कन्याकुमारी पर्यंत आख्खा हिन्दुस्थान पेटून उठला. देशाच्या कानाकोपऱ्यांत हजारोंनी बळी गेले, अनेकांची धरपकड झाली, अनेकांच्या घरांची राखरांगोळी झाली. अक्षरशः रानी वणवा पेटावा आणि त्यांनी लहान मोठे वृक्ष, झाडं, वेली आणि तृणांकुर सुध्दा होरपळून निघावेत. अगदी तश्शी गत झाली. हिन्दुस्थानला स्वातंत्र्य मिळालं ते काही सुखासुखी नाही मिळालं. आज त्या सर्व ज्ञात, अज्ञात हुतात्म्यांचे आत्मे जेथे कुठे असतील तेथून ते तुमच्या आमच्याकडे पहात असतील आणि काय वाटत असेल त्यांना ? आजच्या ७५व्या स्वातंत्र्यातील दिवाळीच्या दिवशी अंतःकरणापासून निदान कृतज्ञता तरी व्यक्त करुया आणि जाण ठेवूया. व्यर्थ न ते बलिदान! वन्दे मातरम् !

**– विजय प्रभाकर साष्टे, पनवेल**

**त्रैमासिक कर्नाळा मधील प्रकाशित लेख साभार.**